# दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र

# वार्षिक अहवाल

# शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९

**समन्वयक - प्रा. डॉ. एस. जी. गोल्डे** **सदस्य - प्रा.डॉ.सी.एस.वाणी**

कबचौउमवि संलग्न खान्देशातील एकमेव दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र महाविद्यालयात आहे. विद्यावर्धिनी महाविद्यालय हे स्थापनेपासूनच तळागळातील वंचित व दुर्लक्षित अशा विद्यार्थ्यांना आधार देणारे विद्येचे व मायेचे माहेर घर म्हणून ओळखले जाते. याचाच एक भाग म्हणून आणि विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे वेगळेपण जपणारा विभाग म्हणजे महाविद्यालयातील दिव्यांग विभाग होय. या विभागामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांची शिक्षणाची भूक भागविण्याचे काम केले जाते. याबरोबरच दिव्यांग विद्यार्थ्यांचे असलेल्या सुप्त कला गुणांना चालना देण्याचे काम देखील केले जाते. विभागामध्ये जागतिक अंपग दिन. पांढरी काठी दिन, सांस्कृतिक कार्यक्रम आदी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्रामध्ये एकुण २१ विद्यार्थी प्रवेशित असून यांना या केंद्राच्या माध्यमातून विविध सोयीसुविधा उपलब्ध करून दिले जातात. जसे परिक्षेसाठी लेखनिक , अद्यायावत सॉफ्टवेअरसह संगणक, ब्रेल लिपीमधील पुस्तके, समाज कल्याण विभागाव्यतिरिक्त शिष्यवृत्ती इत्यादी.

- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये हिंदुस्तान पेट्रोलियम लि. मुंबई या संस्थेकडून शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी महाविद्यालयातील दिव्यांग व इतर मागासप्रवर्गातील ५० विद्यार्थ्यांचे फॉर्म पाठविले. पैकी ०९ दिव्यांग विद्यार्थी आणि इतर २९ विद्यार्थी अशा एकुन ३८ विद्यार्थ्यांना रु.२२३७००/- ची शिष्यवृत्ती त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाली.

- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये दुसरी शिष्यवृत्ती म्हणजे हेल्प द ब्लाईंड फाउंडेशन चेन्नई या संस्थेकडे विभागातील १२ दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती फॉर्म पाठविण्यात आले त्यापैकी १० विद्यार्थ्यांना रु. ७००००/- ची शिष्यवृत्ती मंजुर होउन त्यांना धनादेशाव्दारे अदा करण्यात आली.
- जागतिक पांढरी काठी दिनानिमित्त दिव्यांग विभागामार्फत दि.१५ ऑक्टोबर २०१८ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी उद्घाटक व विशेष अतिथी म्हणुन संस्थेचे चेअरमन मा.श्री.अक्षयभाऊ छाजेड, आदि संस्थेचे सन्मानीय पदाधिकारी उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर सूर्यवंशी उपस्थित होते.
- क.ब.चौ. उमवि जळगांव आयोजित रूसा अंतर्गत सर्वसमावेशी दिव्यांग सहाय्यभूत तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठी विभागातील ०५ दिव्यांग विद्यार्थ्यांना निवासी सात दिवस क.ब.चौ. उमवि जळगांव येथे पाठविण्यात आले या विद्यार्थ्यांनी हे तंत्रज्ञान प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.
- क.ब.चौ.उमवि जळगांव आयोजित कुसुंबा येथे झालेल्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवात विभागातील विनय अनंत वाघ या विद्यार्थ्यांने सुगम संगीत प्रकारामध्ये व्दितीय क्रमांक तर लोकगीतामध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केलृ
- लुई ब्रेल बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने २६ व २७ जानेवारी २०१९ या कालावधीत चाळीसगांव येथे आयोजित दिव्यांग क्रिकेट स्पर्धेमध्ये विभागातील ०४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.
- विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांना सहाय्यभूत तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध होण्यासाठी क.ब.चौ.उमवि कडे प्रस्ताव सादर केला.
- रूपाली सुभाषगीर गोसावी, चेतन चिंधा पाटील व कविता विलास चव्हाण यांना अनुक्रमे ३२०००/- , १४०००/-,२५०००/- अशी एकुण ७१०००/- रूपये ची केंद्रसरकारकडून NCP ची शिष्यवृत्ती मिळाली.
- विभागातील दिव्यांग विद्यार्थी राकेश काहिऱ्या पावरा याची बँक ऑफ बडोदा या बँकेमध्ये क्लार्क पदावर निवड झाली.